**प्रेसनोट** **दि.२६/०३/२०१९**

## विश्रांतवाडी पोलीस स्टेशन,पुणे

## गांजा विक्री व अवैधधंदयाच्या गुन्हयातील पाहिजे आरोपी सुरज उर्फ गुंडया माचरेकर याच्या पोलीसांनी आवळल्या मुसक्या

विश्रांतवाडी पोलीस स्टेशन गु.र.क्र १२३/२०१८एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८ (क), २०(ब)(त्त)(सी ),२९, मुंबई प्रोहीबीशन ॲक्ट कलम ६५ ई, मुंबई जुगार कायदा कलम ४, ५ व गु.र.क्र ८०/२०१९ महाराष्ट्र पोलीसकायदा १४२ व महाराष्ट्र जुगार कायदा कलम ४, ५ या गुन्हयातील गांजा, जुगार, दारुविक्री सारखे अवैधधंदे करणारा पाहिजे आरोपी सुरज उर्फ गुंडया माचरेकर रा. सर्व्हे नं. ४६ भिमनगर, विश्रांतवाडी, पुणे हा एक वर्षापासून पोलीसांना गुंगारा देत फरार होता. तो दि. २५/०३/२०१९ रोजी कामोठे ब्रीज, सरोवर हॉटेल समोर, कामोठे नवी मुंबई येथे येणार असल्याची गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाल्याने विश्रांतवाडी पो.स्टे. कडील तपास पथकाचे अधिकारी व कर्मचारी यांनी मिळालेल्या बातमी प्रमाणे नवी मुंबई येथे जावून कामोठे पोलीस स्टेशन कडील स्थानिक पोलीसांची मदत घेवून, सापळा रचून, आरोपी सुरज ऊर्फ गुंडया मनोहर माचरेकर यास कामोठे, नवी मुंबई येथून ताब्यात घेवून दाखल गुन्हयात अटक करण्यात आली असून तपासकामी पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आलेली आहे.

सदरची कारवाई मा. अपोआ श्री फुलारी सो।, मा. पोउआ परि-४ श्री अक्कानवरु सो।, मा.सपोआ खडकी विभाग श्री पाटील सो।, यांचे मार्गदर्शना खाली विश्रांतवाडी पो.स्टे. चे वपोनि अरुण आव्हाड, तपास पथकाचे अधिकारी पोउनि अभिजित चौगुले व कर्मचारी प्रविण राजपुत, पोना विनायक रामाणे, यशवंत किर्वे, प्रविण भालचिम,पोशि प्रफुल्ल मोरे, रिहान पठाण, किशोर दुशिंग, शेखर खराडे, अनिकेत भिंगारे यांनी पार पाडली.